<u>ग्रा. वि. व ज. सं. वि./पंरा-1</u>

## यशवंत पंचायत राज अभियान तथा पंचायत सबलीकरण व उत्तदायित्व प्रोत्साहन योजना

**ग्रामीण** महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान आहे. राज्यात पंचायत राज संस्थांंमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणा-या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी सन 2005-2006 या वर्षापासून विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरांवर "यशवंत पंचायत राज अभियान" सुरु करण्यात आले आहे. राज्यात चालू असलेल्या "यशवंत पंचायत राज अभियानाच्या" धर्तीवर देशपातळीवर पंचायत राज मंत्रालयाने पंचायत राज व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना तसेच राज्यातील पंचायत राज संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी सन 2011-12 पासून पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना सुरु केली आहे. ग्राम विकास विभागाने सुरु केलेले यशवंत पंचायत राज अभियान व केंद्र शासनाने सुरु केलेली पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना यांचा उद्देश एकच असल्याने दोन्ही योजना एकत्रितपणे राबविण्यात येत आहे.

**योजनेचे उद्देश -**

- घटनेच्या 11 व्या यादीतील कलम 243 G नुसार, पंचायत राज संस्थांना प्रदानीकरणाद्वारे (निधी (Funds) कार्य (Functions), मनुष्यबळ (Functionaries) सक्षम करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन देणे.
- पंचायत राज संस्थांच्या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता येण्यासाठी उत्तरदायित्व पद्धती अंमलात आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.

यशवंत पंचायत राज तथा पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजनेअंतर्गत पंचायत राज संस्थांचे अचूकपणे मूल्यांकन केले जात आहे. जिल्हा परिषदेच्या मूल्यमापनासाठी मुख्य विषय 8 व उपविषय 35 असून त्यांतील मुद्दे 56, पंचायत समितीच्या मूल्यमापनासाठी मुख्य विषय 7 व उपविषय 31 असून त्यातील मुद्दे 59 आणि ग्राम पंचायतीच्या मूल्यमापनासाठी मुख्य विषय 17 उपविषय 72 असून त्यातील मुद्दे 45 यांचा समावेश असल्यामुळे मूल्यमापन करताना पंचायत राज संस्थांची कामगिरी सूक्ष्मपणे तपासली जाते.

**यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत पुरस्काराचे स्वरुप :**

राज्यातील अत्युत्कृष्ट तीन जिल्हा परिषदा, तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतींना राज्यस्तरावर तसेच तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतींना विभागस्तरावर पुरस्कार देण्यात येतात.

**अ) राज्यस्तर पुरस्कार :**

**जिल्हा परिषदा :-** 1. प्रथम पारितोषिक - रु. 25,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

2. द्वितीय पारितोषिक - रु. 15,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

3. तृतीय पारितोषिक - रु. 10,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**पंचायत समिती :-** 1. प्रथम पारितोषिक - रु. 15,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

2. द्वितीय पारितोषिक- रु. 12,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

3. तृतीय पारितोषिक रु. 10,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**ग्रामपंचायती :-** 1. प्रथम पारितोषिक - रु.7,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

2. द्वितीय पारितोषिक - रु.5,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

3. तृतीय पारितोषिक - रु.3,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**ब) विभागस्तर पुरस्कार :**

**पंचायत समिती** :- 1. प्रथम पारितोषिक - रु.10,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

2. द्वितीय पारितोषिक - रु.7,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

3. तृतीय पारितोषिक - रु. 5,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

**ग्रामपंचायती :-** 1. प्रथम पारितोषिक - रु. 3,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

2. द्वितीय पारितोषिक - रु. 2,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

3. तृतीय पारितोषिक - रु. 1,00,000/- रोख रक्कम स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र

वर नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांची एकूण रक्कम रु.270.00 लाख व पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमासाठी रु. 21.00 लाख असे एकूण रु.291.00 लक्ष ची तरतूद सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात करण्यात आली आहे.

**<u>पंचायत सबलीकरण व उत्तदायित्व प्रोत्साहन योजना पुरस्काराचे स्वरुप</u>**

पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजनेअंतर्गत तालुकस्तरावर, जिल्हास्तरावर, विभागस्तरावर आणि राज्यस्तरावर पारितोषिक निवड समितीची स्थापना करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने पंचायतराज संस्थांचे मूल्यमापन करुन राज्यात प्रथम आलेली जिल्हा परिषद, राज्यातून प्रथम आलेली पंचायत समिती, व राज्यातून प्रथम आलेली अनुसूचित क्षेत्रातील पंचायत समिती, प्रत्येक विभागातून पहिल्या आलेल्या दोन ग्रामपंचायती व राज्यातून अनुसूचित क्षेत्रातील प्रथम आलेल्या दोन ग्रामपंचायती यांची शिफारस केंद्र शासनास केली होती. केंद्र शासनाने देशपातळीवर तपासणी संस्थांची निवड करुन त्यांच्यामार्फत वरील संस्थांची तपासणी करुन घेतली. व त्याअनुषंगाने केंद्र शासनाने "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व योजना" या योजनेंतर्गत सन 2011-12 या वर्षात 17 पंचायत राज संस्थांना एकूण रु.1.39 कोटी रक्कमेचे पुरस्कार जाहीर केले.

| अ.क्र. | पंचायत राज संस्थेचे नांव | पुरस्कार रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषद, ठाणे, | 25.00 |
| 2 | भिवंडी पंचायत समिती, जि. ठाणे, | 15.00 |
| 3 | कोरची पंचायत समिती, जि. गडचिरोली, (अनुसूचित क्षेत्र) | 15.00 |
| 4 | पिंगुळी ग्रामपंचायत, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग, | 6.00 |
| 5 | वऱ्हाड जांभुळपाडा ग्रामपंचायत, ता. सुधागड, जि. रायगड, | 6.00 |
| 6 | चहार्डी ग्रामपंचायत, ता. चोपडा, जि. जळगांव, | 6.00 |
| 7 | मिरजगाव ग्रामपंचायत, ता. कर्जत, जि. अहमदनगर, | 6.00 |
| 8 | बीड (सितेपार) ग्रामपंचायत, ता. मोहाडी, जि. भंडारा, | 6.00 |
| 9 | आनंदवन ग्रामपंचायत, ता. वरोरा, जि. चंद्रपूर | 6.00 |
| 10 | कांदळी ग्रामपंचायत, ता. जुन्नर, जि. पुणे, | 6.00 |
| 11 | नृसिंहवाडी ग्रामपंचायत, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, | 6.00 |
| 12 | श्रीरामपूर ग्रामपंचायत, ता. पुसद, जि. यवतमाळ, | 6.00 |
| 13 | देवगाव ग्रामपंचायत, ता. अचलपूर, जि. अमरावती, | 6.00 |
| 14 | नसडगाव ग्रामपंचायत, ता. जालना, जि. जालना, | 6.00 |

| | | |
|---|---|---|
| 15 | झरी ग्रामपंचायत, ता. लोहा, जि. नांदेड, | 6.00 |
| 16 | कुरगाव ग्रामपंचायत,ता. पालघर, जि. ठाणे, (अनुसूचित क्षेत्र) | 6.00 |
| 17 | पिंपळगाव ग्रामपंचायत, ता. देसाईगंज, जि.गडचिरोली, (अनुसूचित क्षेत्र) | 6.00 |
| | **एकूण** | 139.00 |

**पंचायत राज संस्थांना अधिकार देण्याबाबत सन 2011-12 मध्ये महाराष्ट्राचा वाढीव प्रदानीकरणात देशात प्रथम व संचयी प्रदानीकरणात देशात तृतीय क्रमांक**

पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यांनी पंचायत राज संस्थांचे सबलीकरण आणि उत्तरदायीत्व वाढविण्यासाठी "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजन " (Panchayat Empowerment and Accountability Incentive Schemes-PEAIS) योजना 2005-06 पासून सुरु केली आहे. याद्वारे विविध राज्यांनी 73 व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायत राज संस्थांना प्रदान केलेल्या अधिकारांचे मूल्यांकन करुन प्रत्येक राज्याचा निर्देशांक (Devolution Index) ठरविण्यात येतो.

Devolution Index -DI मध्ये सन 2008-09 या कालावधीत महाराष्ट्र देशात 13 व्या स्थानावर होते. सन 2009-10 तसेच सन 2010-11 मध्ये राज्यास देशात तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. याबद्दल केंद्र सरकारच्यावतीने राज्यास सलग दोन वर्षे रुपये 1 कोटीचा पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सन 2011-12 मध्ये "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजन " अंतर्गत वाढीव प्रदानीकरणात देशात प्रथम व संचयी प्रदानीकरणात देशात तृतीय क्रमांक मिळाला असून केंद्र शासनाकडून प्रतिकात्मक पुरस्कार म्हणून राज्यास रुपये 2 कोटीचे बक्षीस मिळाले आहे.

***************